# NATIONAL SEMINAR

*On*

***Relevance Of Mahatma Gandhi, Dr. Babasaheb Ambedkar And Swatantryaveer Savarkar In Contemporary India***

**24TH, 25TH AND 26TH FEBRUARY 2010**



# SOUVENIR


**Organised By :**

**Department Of Political Science**

**MES's Abasaheb Garware College, Pune &**

**BCUD University Of Pune**

Publisher :

**Dr. Shrikant Gupta**

Principal

Abasaheb Garware College, Pune.

---

Editor :

**Dr. Sharad Ghodke**

Head of Dept. Political Science

Abasaheb Garware College, Pune.

---

Asset. Editor :

**Dr. Aparna Agashe**

**Dr. Shobha Karekar**

---

Oraganising Committee :

Shri. Ravindra Wanjarwadkar (Chairman, Governing Body M.E.S. Pune)

Prin. Dr. Shrikant Gupta (Principal, Abasaheb Garware College, Pune. )

Dr. G.L. Bhong (Vice Principal )

Dr. P.B. Buchade (Vice Principal Non Grant)

Dr. Monika Vaidya

Dr. Verdha Deshpande

Dr. R.C. Chikate

Dr. Maithali Jog

Dr. Leena Chandorkar

Dr. Chetana Desai

Dr. Chitra Nagarkar

Dr. R. S. Suryawaanshi

Dr. Amol Vidyasagar

Dr. Parag Thamhankar

---

**Printer :**

**Ajit Enterprises, Pune.**

**Mob. : 9822435080**

**Ph. 020 - 25447986**

# NATIONAL SEMINAR

on

# Relevance of Mahatma Gandhi, Dr. Babasaheb Ambedkar, Swatantryaveer Savarkar In Contemporary India

मएसो
दीडशे वर्षांचा ज्ञानवृक्ष
Knowledge Tree

## Organised By :

Department of Political Science,
Abasaheb Garware College
And
BCUD, University of Pune.

# SOUVENIR

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील सामाजिक न्याय

डॉ. माणिक सोनावणे

प्रस्तुत निबंधाच्या सुरवातीला या सामाजिक न्याय संकल्पनेचा अर्थ, आशय व सामाजिक न्याय सिद्धांताचा आढावा घेतला असून भारतीय समाज व्यवस्थेत सामाजिक न्याय निर्मीतीसाठी डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या योगदानाचा व तदनुशंगीक विचारांचा अढावा घेतला आहे.

सामाजिक न्यायाची संकल्पना प्रामुख्याने सामाजिक अस्तित्वाची रूपरेषा जाणून घेण्याशी संबंधित आहे. न्याय हा शब्द विपुलतेवर अथवा गैरवाजवी प्रमाणावर आक्रमण करणारा शब्द आहे. उदारमतवादी परिपेक्षामध्ये जॉन रॉल्स यांनी आपल्या अथेअरी ऑफ जस्टिस या ग्रंथात सामाजिक न्याय हा लाभांश वितरणाशी संबंधित आहे असे म्हटले आहे. एकंदरीत सामाजिक न्यायाची संकल्पना ही न्याय वितरण व्यवस्था कशी असावी याबाबतचा आकृतिबंध पुरवत आहे.[१] १९७१ साली प्रकाशित झालेला जॉन रॉल्सचा वरील ग्रंथ राजकीय सिद्धांतात एक मैलाचा दगड समजला जातो. तसाच तो कृष्णवर्णीयांच्या नागरीहक्क चळवळीस व त्यांच्या मागण्यास मिळालेला प्रतिसादही समजला जातो. त्यामुळे कृष्णवर्णीयांमध्ये असलेल्या दारिद्र्याकडे सगळ्या जगाचे लक्ष वेधले गेले आहे. त्यामुळे सर्वांना समान स्वातंत्र्य व समान संधी हे सामाजिक न्यायाचे पहिले प्राधान तत्त्व आहे ही बाब सिद्ध झाली आहे. रॅाल्सने सुचविलेल्या तत्त्वानुसार सर्वांना सारख्या संधी, नोकऱ्या आणि पदे प्राप्त झाली पाहिजेत असे मानले आहे. परंतु ही पदे देत असताना सामाजिक व आर्थिक असमानता निर्माण होत असेल व त्यातून गरीबांना अधिक लाभांश मिळत असतील तर रॅाल्स असा भेदभाव स्वीकारतो. म्हणून त्याचा सामाजिक न्याय सिद्धांत सर्वांना केवळ स्वातंत्र्य मिळण्यास प्रोत्साहन देतो असे नाही तर सर्वांना अधिक प्रमाणात सामाजिक व आर्थिक समानता प्रदान करतो आणि अशी समानता निर्माण करण्यासाठी कार्यकर्ते व राज्याचा हस्तक्षेप महत्त्वाचा मानतो.[२] या पार्श्वभूमीवर सामाजिक न्याय म्हणजे समाजाने चांगल्या-वाईट गोष्टीचे न्याय व रास्त वितरण करणे होय. समाज ज्या वस्तू व सेवांची निर्मिती करतो त्यांचे वितरण कितपत रास्त व योग्य प्रकारे करतो, यावर सामाजिक न्याय अवलंबून असतो. म्हणून असे वितरण करतानां सामाजिक कार्यक्षमता, योग्यता व गरज इ. निकष लावता येतात. सामाजिक न्याय म्हणजे लोकांना अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी त्यांचे सामाजिक हक्क म्हणून प्राप्त करून देणे व उरलेल्या अतिरिक्त वस्तूंचे वितरण रास्त व समतेच्या निकषांवर करणे होय. याचा अर्थ खऱ्या अर्थाचा सामाजिक न्याय हा वितरणात्मक न्यायातच शक्य असतो. यात संधींचे विषम वाटप केलेले असते. ज्यांच्यावर निसर्गाबरोबरच

मानवानेही अन्याय केला त्या दुर्लक्षित व दुर्बल लोकांना संधीचे वाटप जास्त प्रमाणात केलेले असते. ज्यांच्या गरजा भागलेल्या आहेत, त्यांच्या तुलनेत ज्यांच्या गरजा भागल्या नाहीत अशा लोकांना जास्त प्रमाणात संधी दिली जाते. अशा विषम वितरणामुळेच अन्यायग्रस्त लोक आपले न्यून भरून काढू शकतात. त्याच वेळी त्यांना खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात सामील करून घेतले असे म्हणता येईल.[३] तेंव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय निर्माण झाला असेही म्हणता येते.

थोडक्यात सामाजिक न्यायाचा प्रश्न हा प्रामुख्याने तुटवड्याच्या किंवा दुर्मिळतेच्या परिस्थितीमध्ये उद्‌भवतो. कारण अशा परिस्थितीमध्ये वस्तूचे वितरण, सेवेची संधी, संपत्ती, सत्ता व प्रतिष्ठा याची दुर्मिळता असते. म्हणून अशा अवस्थेत वस्तू आणि सेवेच्या संधीचे वितरण योग्य पद्धतीने केले म्हणजे तो न्याय आहे असे समजले जाते. याअर्थाने कोणतेही आधुनिक राज्य व्यक्ती जीवनाला अधिक सुखकर आणि सुसह्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. व्यक्तींच्या क्षमतांचा विकास करून लोकल्याण व सामाजिक न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याच बरोबर मानवनिर्मित असमानता नष्ट करणे, प्राथमिक गोष्टींचे योग्य वाटप करणे, दुर्बलांचे कल्याण करणे, क्षमता आणि साधने नसलेल्या घटकांना साधन सामग्रीचे पुर्नवाटप करणे, गरीब व्यक्तींना आत्मभानाची जाणीव करून देणे आणि ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे तो नष्ट करून समाजातील शेवटच्या व्यक्तीला योग्य संधी प्राप्त करून देणे व त्यांच्या क्षमता वाढवणे हा सामाजिक न्याय संकल्पनेचा मतीतार्थ आहे. या अर्थाने सामाजिक न्याय ही संकल्पना सर्वव्यापक असून यात व्यक्तीला जीवनाच्या सर्व क्षेत्रात समताधिष्ठीत, अधिकारसंपन्न व प्रतिष्ठापूर्व समावेशाचा अंतर्भाव केला आहे. त्यामुळे ही संकल्पना सर्वव्यापक आहे. तीचा आशय सामाजिक, आर्थिक व राजकीय परिपेक्षात विस्तृत आहे.

प्रत्येकाला पुरेसा व योग्य रोजगार, पुरेशा सुखसोयींनी युक्त निवारा आणि आरोग्यपूर्ण जीवन या गरजा पूर्ण झाल्या तरच त्याला नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडता येतील. कारण वरील गोष्टींपासून वंचित असलेल्या व्यक्तिंना राष्ट्रीय स्वातंत्र्याचे मूल्य नसते. दुसऱ्या बाजूला आर्थिक न्यायासाठी समाजातील आर्थिक विषमता प्रमाणाबाहेर असता कामा नये. विकासातून निर्माण होणाऱ्या वस्तू व धनसंपदा यांचे लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचवणे. त्याच बरोबर स्त्री पुरुषांच्या समान कामाला समान वेतन, किमान वेतन, भविष्य निर्वाह निधीसारख्या सामाजिक सुरक्षा सेवा इ. गोष्टींच्या उपलब्धतेतून आर्थिक न्याय प्रस्थापित होत असतो.[४]

दुसरीकडे केवळ समान संधी देऊन विषमता कमी होत नसते. त्यासाठी दुर्बल घटकांना विशेष संधी व सोयी देऊन बचावात्मक भेदभाव करणे सामाजिक न्यायाशी सुसंगत असते. निसर्गाने व समाजाने निर्माण केलेल्या विषमतांना मानवी विवेकबुद्धीने दिलेले ते प्रतिअव्हान असते. निम्न स्तरावरील लोक कनिष्ट दर्जाचे व्यवसाय करतात याचे निमित्त करून सामाजिक अपात्रता किंवा अस्पृश्यांना विकासाच्या वाटा बंद

करून त्यांचे सामाजिक दास्यद्दढ केले होते. म्हणुन भारतातील दलित-शोषित हे या सामाजिक अन्यायाचे ठळक उदाहरण आहे. ते विषमतेचे बळी आहेत आणि संधीपासून वंचित आहेत. त्यांना जास्तीत जास्त लाभदायक ठरेल अशी सामाजिक व आर्थिक फेररचना करणे सामाजिक न्यायात अभिप्रेत आहे. सामाजिक न्यायाच्या चौकटीत भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करता भारतात नैसर्गिक विषमतेबरोबर मानव निर्मित विषमताही अस्तित्वात आहे. जात-पात, गरीब-श्रीमंत, ग्रामीण-शहरी, शिक्षित-अशिक्षित असे भेद आहेत. अशा या विषमताधिष्टीत समाजात माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थाही टिकून आहेत. सामाजिक न्यायाची सामाजिक बाजू वरील अवैध, अनैतिक व अमानुश भेदभावांचा निषेध करते. जात, धर्म, लिंग, वंश व पंथ हे भेदभावाचे निकष ती बाद ठरविते. सार्वजनिक हक्काच्या लाभांपासून या निकषांच्या आधारे कोणालाही अपात्र ठरविले जावू नये अशी मागणी करते. केवळ समान संधी देवून ही विषमता कमी होण्याऐवजी वाढू शकते म्हणून दुर्बल घटकांना विशेष संधी देऊन बचावात्मक किंवा संरक्षणात्मक भेदभाव करणे सामाजिक न्यायाशी सुसंगत ठरते.[५] या चौकटीत येथील विषमतांचा विचार केला तर सार्वजनिक जीवनात प्रचलित असलेल्या विषमता नष्ट करणे, व्यक्तीचे माणूसपण जपणे, त्याला आपले जीवन सुखकर वाटेल व त्याला जीवनात प्रतिष्ठा मिळेल अशी परिस्थिती निर्माण करणे. या बाबी सामाजिक न्यायाच्या तत्त्वांनुसार आवश्यक आहे. त्याच बरोबर राजकीय संधी किंवा राजकीय अधिकार देताना धर्म, वंश, जात, लिंग, वर्ण या अप्रस्तुत निकषांच्या अधारे भेदभाव केला जाणार नाही ही सामाजिक न्यायाची वैधानिक बाजू आहे. व्यापक अर्थाने वरील घटकांच्या अधारे राजकिय प्रक्रियेत सहभाग घेण्यास मज्जाव करणे सामाजिक न्याय तत्वाच्या विरोधी आहे.

थोडक्यात सामाजिक न्याय ही सर्वव्यापक संकल्पना असून यात व्यक्तीला जीवनाच्या सर्व क्षेत्रात समताधिष्ठीत, अधिकारसंपन्न व प्रतिष्ठापूर्व समावेशाचा अंतर्भाव केला आहे. जगाच्या पाठिवर बहुसंख्य राष्ट्रांनी सामाजिक न्याय आणि मानवी मुल्यांनी युक्त जीवन उपलब्ध करून देण्याचा प्रयन्त केला आहे.

डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक न्याय विषयक विचार समजून घेण्यापूर्वी भारतीय समाज जीवन समजून घेणे उचीत ठरेल. सामाजिक न्याय ही संकल्पना भारतासारख्या जटिल समाजव्यवस्था असणाऱ्या देशात गांभिर्याने विचारात घेणे आवश्यक आहे. कारण या देशात जातीवर आधारीत विषम समाज व्यवस्था आहे म्हणून सार्वजनिक जीवनात विषम स्वरूपाचे व्यवहारात अंगिकारले जात आहेत. अशा व्यवस्थेत गुणवत्ता ही जातीच्या आधारावर विचारात घेतली जाते म्हणून वरिष्ठ जातींना गुणवत्तेचे सर्व लाभ आपोआपच प्राप्त होतात. तर कनिष्ठ जातीतील लोकांची गुणवत्ता नेहमीच वादातीत म्हणून चर्चीली जाते. पर्यायाने कनिष्ठांना त्यांच्या श्रमावर व गुणवत्तेवर आधारीत हिस्सा मिळणे कष्टप्राय होते. त्यामुळे भारतीय परिपेक्षात सामाजिक न्यायाचा अर्थ लावत असताना फार मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. कारण सार्वजनिक जीवनात

अनेक शतकांपासून जात, धर्म,वंश आणि लिंग या आधारावर मोठ्या प्रमाणावर भेदभाव केले जात आहेत. जात ही कर्मावर अधारीत न राहाता जन्मावर आधारीत झाली आहे. त्यामुळे एखादा उच्चपदस्थ जोडे बनविण्याचा धंदा करत असला तरी तो उच्चवर्णिय राहतो तर एखादा मागास व्यक्ती शिक्षकाचे काम करत असला तरी तो मागासच राहातो. या पार्श्वभूमिमुळे भारत देश अनुसूचित जाती, जमातींच्या समस्यांमुळे वादग्रस्त ठरला आहे. अन्य कोणत्याही समाजव्यवस्थेत नसलेली कर्म व जन्मावर आधारीत अशी अत्यंत बंदिस्त व स्तरीकृत जातिव्वस्था हे या समाजव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. विशेष म्हणजे या बंदिस्त व स्तरीकृत समाज व्यवस्थेला कर्मवादाचा आधार दिला जाऊन मानवामानवात उच्च-नीच, स्पृश-अस्पृश्य अशी अमानुषता पूरक व धर्ममान्य ठरविली गेली आहे. काळाच्या ओघात यातून अनेक समस्या निर्माण झाल्या. यापैकी बहुतेक समस्या या जातिव्यवस्थेतील शूद्र समजल्या जाणाऱ्या व अस्पृश्य जाती-जमातींच्या आहेत.[६] अस्पृश्यतेच्या निर्मितीमागची कारणे कोणतीही असली तरी, ज्यांना अस्पृश्य समजले गेले त्यांना आजतागायत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय समाजव्यवस्थेत जे सामाजिक सुधारणेचे पर्व सुरू झाले. त्यात या जातींच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत प्रचारही सुरू झाले. परंतु या काळात त्यांची इतर सर्वण जातींप्रमाणे प्रगती झाली नाही. ब्रिटिश पूर्व काळ व ब्रिटिश काळात समाजव्यवस्थेतील भेदभाव नष्ट करण्यासाठी राजा राममोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, धोंडो केशव कर्वे, महात्मा फुले, महात्मा गांधी, वि.दा. सावरकर, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांचा सिंहाचा वाटा आहे. या समाज धुरिणांबरोबरच इंग्रज सरकारने देखील भारतातील वरील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. इंग्रजी राजवटीत भारतातील सामाजिक जीवनात एक मूलगामी स्थित्यंतर घडून येण्यास प्रारंभ झाला. प्रत्येक माणसाला माणूस म्हणून काही निसर्गसिद्ध हक्क आहेत आणि त्यांचे रक्षण करणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. या तत्त्वावर इंग्रजी राजवट आधारीत असल्याने जाती-धर्माचा विचार न करता सर्वांना सारखेपणाने लागू होणारे कायदे व नियम त्यांनी लागू केले. दुसरीकडे सामाजिक सुधारणेच्या कार्यात महात्मा फुले यांनी ख-या अर्थाने अस्पृशता निवारण्याचे मूलगामी विचार मांडले. त्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन मोठ्या धैर्याने समाज सुधारणा आणि अस्पृश्यता निवारणाच्या कार्याचा प्रारंभ केला. वरिष्ठ वर्गाच्या सहानुभूतीवर विसंबून राहून शुद्रातिशुद्रांचा उध्दार होणे शक्य नाही हे ओळखून त्यांनी यजाती व्यवस्था ही इश्वरनिर्मीत नाही ती वरिष्ठ वर्णियांच्या स्वार्थबुध्दीतून उगम पावलेली आहेय असे मत मांडले. त्यांनी दलितांना जातीभेदाविरुध्द उघड भुमिका घेऊन संघटीपणे व स्वाभिमानपूर्वक दाऱ्याशृखंला तोडून टाकण्याचे आव्हान केले.[७] महात्मा ज्योतिराव फुलेंनी समतेवर आधारलेला समाज स्थापन करण्याचा, अस्पृशांना अस्पृश्यतेच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा व देशातील विषम समाजरचना मोडून काढण्याचा विचार समाजापुढे मांडला. त्यांच्या ह्या

विचारातून अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याचा जन्म झाला. इ. स. १८५२ मध्ये त्यांनी अस्पृश्य महार-मांग आदी जातींच्या मुलांसाठी पुण्यात नाना पेठ भोकरवाडी येथे सर्वप्रथम शाळा सुरू केली. १८६८ मध्ये त्यांनी आपल्याच घरातील पाण्याचा हौद महार-मांगांसाठी खुला केला. अशा वृत्तीतून त्यांनी समाजातील हजारो वर्षापूर्वीच्या प्रश्नाला वाचा फोडून दलितांच्या अस्पृश्यता निवारण व शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा धाडसी प्रयत्न केला.[८] त्यांच्या या कार्यात त्यांचे गुरू लहुजी वस्ताद साळवे, पत्नी सावित्रीबाई फुले व शिष्या मुक्ता साळवे यांनी मोलाचे सहकार्य केले.

काळाच्या ओघात दीन-दलित जनतेचे दु:ख-दारिद्र्य शासनाच्या व राज्यकर्त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मागास जनतेची आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न सुरू केले. ही समाज सुधारणेची चळवळ वेगवेगळ्या सरूपात आजतागायत सूरू आहे. परंतु आजही समाजात अन्याय, अत्याचार आणि भेदभाव अस्तित्वात आहेत. त्यामुळे अन्यायग्रस्त समुदायांना बरोबरीची व सन्मानाची वागणूक देऊन त्यांच्यातील क्षमता विकसीत करण्यासाठी न्यायाचे तत्त्व व्यवहारात आले आहे. दुर्बलांना सुरक्षा व संधीची हमी देणे, त्यांच्या कल्याणासाठी आरोग्य, शिक्षण, सामाजिक सेवा व इतर सवलतींचे वितरण करणे सामाजिक न्यायाच्या तत्त्वात अंतर्भुत आहे. सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करणे हे सामाजिक न्यायाचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच दुर्बलांच्या क्षमता विकसित करून त्यांच्या सशक्तीकरणाच्या प्रक्रियेला बळ देणे हे सामाजिक न्याय प्रक्रियेत अभिप्रेत आहे.[९] त्यामुळे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारीत समाजांमध्ये आज सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे मोठे आकर्षण आहे. कारण शतकानुशतके वरचढ राहिलेल्या घटकांनी सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांचा मोठा वाटा बळकावला. परंतु बहुसंख्य असलेला समाज या तिनही गोष्टींपासून वंचित राहिला आहे आगदी देशात लोकशाही मूल्यांची प्रस्थापना झाल्यानंतरही परंपरागत विषमता अबाधीत राहिली आहे. तिच्या उच्चाटनाच्या जाणीवेतून भारतीय समाजात सामाजिक न्यायाची कल्पना प्रचलित झाली आहे.
[१०]

सामाजिक न्याय प्रस्थापित करताना सशक्त लोक आणि अशक्त लोक, गरीब व श्रीमंत, सवर्ण आणि दलित यांच्यातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक भेद जाणून घेणे आणि दुर्बल घटकांना व गरीबांना प्रोत्साहन देऊन सशक्त करणे आवश्यक ठरते. म्हणून जातीभेद नको पण जातीभेद समजून घेणे व त्या आधारावर समाजात समान न्याययुक्त परिस्थिती निर्माण करणे आवश्यक आहे. काही जरी असले तरी समाजातल्या उपेक्षित व दुर्बल लोकांना विविध लाभ प्राप्त होणे आवश्यक ठरते. कारण एका चांगल्या समाजाची ओळख ही त्या समाजातील गरीबांची आपण काळजी कशी व कोणती धोरणे ठरवून त्यांचा आर्थिक, बौध्दिक व सामाजिक स्तर उंचावतो यावर अवलंबून असते. म्हणून लोकशाही मूल्याच्या चौकटीत सामाजिक न्याय ही अवधारणा कशी व्यवहारात आणावयाची हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

आधुनिक युगात न्यायाची मागणी सामाजिक परिवर्तनाशी आणि अन्याय निवारणाशी जोडली गेली आहे. समाजात जेव्हा काही लोक त्यांचा काहीही अपराध नसताना अपमानित आणि अमानवीय जीवन जगतात. तेव्हा त्यांच्या विकासाचे व मानवतेचे मुद्दे पुढे येतात आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणुक सामाजिक न्यायाच्या रूपाने प्रदर्शित होत राहते. याचा अर्थ सामाजिक न्याय हा काळानुरूप बदलत असतो. त्या ठिकाणी केवळ न्याय शब्द अभिप्रेत नसून दुर्बल घटकांना समान पातळीवर आणण्याची तळमळ अथवा धडपड असते. मार्क्सवादी विचारप्रणालीत या तत्वाचा विचार झाला. परंतु तेथे व्यक्ती स्वातंत्र्याला मर्यादा पडली आणि आज हा विचार मोडकळीस निघाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतासाठी सामाजिक न्यायाचा वेगळा विचार मांडणे आवश्यक आहे. कारण या ठिकाणी अनेक धर्म, जाती, पोटजाती व वर्ण आहेत. येथील समाजव्यवस्थेने हजारो वर्ष बहुसंख्याकांना न्याय नाकारला आहे आणि आजही जातीधर्माच्या पारंपरिक व ताठर चौकटीत नाकारला जात आहे. अनेक शतकांच्या परंपरेमुळे आणि जन्मावर वर्णव्यवस्था प्रचलित झाल्यामुळे समाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल घटकांना मदत करून समाजात ताठ मानेने उभे करण्यासाठी विशेष साहाय्य करणे अथवा विशेष संधी-सवलती देणे एका अर्थाने सामाजिक न्याय निर्मीतीचाच एक प्रयत्न असतो.

दलितांच्या उद्धारासाठी झटणाऱ्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांनी हिंदू धर्मग्रंथातील उच्च-नीचता व भेदभावावर प्रखर हल्ला केला. त्यांनी समाज उद्धाराच्या क्रांतिकार्याची सुरुवात १९२७ मध्ये महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने केली. पुढे दलितोद्धारासाठी गोलमेज परिषदेला उपस्थित राहून अस्पृश्यांची बाजू मांडली. पुढे १९३२ मध्ये पुणे कराराच्या माध्यमातून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. हिंदू धर्मीयांमध्ये अस्पृश्यांबद्दल सुधारणाविषयक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केलेली बौद्ध धम्म स्वीकारण्याची घोषणा, प्रत्यक्ष धर्मांतर आणि बौद्ध धम्माचा स्वीकार या बाबींच्या माध्यमातून त्यांनी दलितांना स्वतंत्र ओळख निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला. पुढे घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून केलेले उल्लेखनीय कार्य, कायद्याच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारण, हिंदू कोड बील इ.च्या माध्यमातून सामाजिक न्याय निर्मितीचे व दुर्लक्षीत जनतेचे कल्याण साधण्याचे प्रयत्न केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाती घेतलेल्या सामाजिक न्याय प्रस्थापनेच्या चळवळीची सुरुवात महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून होते.याअस्पृश्यांनाही तळ्यावर पाणी भरण्याचा हक्क आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे दलितांच्या सामाजिक न्यायाच्या प्रश्नांना वाचा फुटली. पुढे त्यांनी अस्पृश्य समाजाला वतनदारी आणि गावकीची कामे सोडून देण्याचा संदेश दिला. तो संदेश एका अर्थाने गावगाड्यातून अस्पृश्यांना मुक्त होण्याचा संदेश होता. त्यामुळे शेकडो अस्पृश्यांनी गावकीची कामे सोडून डॉ. आंबेडकरांच्या आवाहनाला

प्रतिसाद दिला. पुढे १९२८ साली सायमन कमिशनपुढे अस्पृश्यांची कैफियत मांडली, नाशिक येथे सत्याग्रह करून काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळवला, अस्पृश्यांच्या हक्कासाठी तिन्ही गोलमेज परिषदेला हजर राहून अस्पृश्यांच्या न्याय्य हक्काची बाजू मांडली. गोलमेज परिषदेपुढे त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. तथापि १९३२ च्या पुणे करारानुसार अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाऐवजी निवडणुकीत राखीव जागा मान्य करून घेतल्या. १९३५ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली, १९४२ मध्ये ऑल इंडिया शेल्ड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी शिक्षणसंस्था स्थापन केल्या, वृत्तपत्रे सुरू केली आणि सामाजिक आर्थिक व कायद्याच्या चौकटीत विपुल लिखाण केले. एकुणच त्यांचे कार्य तत्कालीन समाजात असणाऱ्या अमानुष अस्पृश्यता, विषमता आणि स्तरीकृत समाजव्यवस्थेच्या विश्लेषणातून पिडित समाजाला सोडवण्यासाठी म्हणजे त्यांच्या सामाजिक न्यायाच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी केलेला प्रतिवाद होता. तसेच दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठीचा संघर्ष होता.

डॉ.आंबेडकरांनी १९३६ साली याजातीचा उच्छेद या प्रबंधात जाती संस्थेच्या उच्छेदनाविषयीचा विचार मांडला. त्यांनी जाती संस्था नष्ट करण्याचा मार्ग म्हणून आंतरजातीय विवाह रूढ करण्याचा विचार मांडला. त्यांनी केलेली हिंदू धर्माची समिक्षा आणि हिंदू धर्माचा त्याग एक प्रकारे हिंदू धर्मात न्यायी समाज निर्माण होणे शक्य नाही या जाणिवेतून नव्या सामाजिक जीवनाची सुरुवात होती. ज्या जीवनात दया, क्षमा, शांती, अहिंसा व प्रेम असणार होते कोणत्याही कारणावरून व्यक्ती व्यक्तीत भेदभाव आणि विषमतेला जागा नव्हती. त्यांची ही कृती अन्यायग्रस्त अस्पृश्य समाजासाठी न्याय्य हक्काची मांडणी होती. थोडक्यात त्यांना दलित, शोषित लोकांना इतरांप्रमाणे स्वाभिमानी जीवन उपलब्ध करून द्यायचे होते. या अर्थाने त्यांचा हा लढा सामाजिक न्याय निर्मितीचा लढा होता. पुढील काळात डॉ.आंबेडकरांनी याथॉट्स ऑन पाकिस्तानय, यस्टेट ॲन्ड मायनॉरिटीजय आणि यहू वेअर दी शूद्राजय या सारखे ग्रंथ लिहून भारतीय राज्यव्यवस्था आणि समाज जीवनातील महत्त्वाच्या प्रश्नांची चिकित्सा केली. लोकशाही राज्यपद्धतीवर श्रद्धा असणारे विचारवंत होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यांची भारतीय समाज जीवनात प्रस्थापना व्हावी असा त्यांचा प्रयत्न होता म्हणून त्यांनी घटना समितीचे सदस्य म्हणून मुलभूत अधिकाराच्या माध्यमातून सर्व लोकांमध्ये लोकशाही मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. घटनेच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा व समतेचा हक्क देऊन सर्व भारतीयांमध्ये सामाजिक न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.[11] म्हणजेच डॉ. आंबेडकरांचे आयुष्य म्हणजे एक गतिमान संघर्ष होता. देशात अस्तित्वात असलेल्या अन्यायाचे परिमार्जन करून सामाजिक न्यायाच्या चौकटीत संपन्न आणि वैभवशाली भारत निर्माण करण्याचा त्यांचा ध्यास होता. याचाच अर्थ त्यांनी राष्ट्र उभारणीच्या कार्याबरोबरच सामाजिक न्याय निर्मीतीचा विचार देशाला दिला.

१९६५ साली संमत झालेला आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याचा पायाच मुळी भेदभावांचे उच्चाटन करण्यावर आधारित आहे. या कायद्यानुसार जन्माधारित भेदभावांचे सर्व निकष आणि मुद्दे भारतातील जाती व्यवस्थेला लागू आहेत. भारतातील जाती व्यवस्था ही जन्माधारित असल्याने या व्यवस्थेने निर्माण केलेले भेदभाव आणि विषमता दूर करायची असेल तर त्यासाठी जाती आधारीत सवलती द्याव्या लागतील. ऐतिहासिक दृष्ट्या मागासलेल्यांना राखीव जागा, विशेष सवलती देणं ही विषमता संपविण्याचा उपाय आहे. विषम समाजरचनेत सामाजिक स्वास्थ कधीच नसतं. विविध क्षेत्रात प्रगतीसाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी समाजातील सर्वच घटकांना आपल्याला न्याय मिळत असल्याची भावना असायला हवी. अशी सुरक्षीततेची भावना राज्यघटनेतील राखीव जागांच्या मदतीने निर्माण केली आहे.

भारतीय राज्यघटनेने मागासवर्गियांसाठी केलेल्या राखीव जागांचा मुळ हेतू यासमान संधीसाठी विशेष संधी या तत्वावर अधारित आहे. म्हणून भारतातील राखीव जागांची तरतूद भेदभावापासून संरक्षण व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी मदतीचा हात आहे. घटनेतील विकासात्मक, संरक्षणात्मक व कल्याणकारी तरतुदी मागास जातीसमुहांना समान पातळीवर आणण्यासाठी केल्या आहेत. त्यामुळे या तरतुदींची मागास जातींच्या विकासामध्ये मोठी मदत झाली आहे या आरक्षणाच्या धोरणाला घटणात्मक रूप देण्यात डॉ. आंबेडकरांचे मोलाचे योगदान आणि दूरदृष्टी आहे. भारतात असलेली दलितांच्या विकासाची सकारात्मक धोरणे प्रामुख्याने आरक्षण धोरणाद्धारेच प्रत्यक्षात आली आहेत. आरक्षण धोरणानुसार केंद्रीय व राज्य सेवेत, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, शासकीय-निमशासकीय संघटना व संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमातींसाठी काही जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. शैक्षणिक संस्थांमध्येही व्यवस्था करण्यात आली आहे. आरक्षणाच्या धोरणाद्धारे दलितांवर शतकानुशतके झालेल्या अन्यायाची अंशत: तरी भरपाई करणे आणि त्यांना सामाजिक-आर्थिक विकासाच्या आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सक्षम बनवणे हा आरक्षण धोरणाचा हेतू आहे.

***